पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०५९ दिनांक २२/०९/२०१९**

## फरासखाना पोलीस स्टेशन

## फरासखाना पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात ७ वर्षापासुन फरारी असलेल्या आरोपीस फरासखाना पोलीस स्टेशनचे तपास पथकाने केली अटक

बजाज फायनान्स कंपनी वाकडेवाडी पुणे या कंपनीस बनावट कागदपत्र सादर करुन त्यांचेकडुन ४,१८,५००/-रुपयाचे कर्ज मंजुर करुन घेवुन त्याआधारे कसबा पेठ पुणे येथील इलेक्ट्रिक दुकानातुन इलेक्ट्रिक वस्तु खरेदी करुन पसार झालेल्या आरोपींवर फ.खाना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१०९/२०१२ भादवी कलम ४२०,४६७,४६८,४७१,३४ अन्वये सन २०१२ साली फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता. दाखल गुन्हयात ७ वर्षापासुन फरारी असलेला आरोपी नामे बिरजु उर्फ बंटी दिनकर पाटील वय ३३ वर्षे व्यवसाय नोकरी सध्या रा.सर्वे नं.४७/३ चव्हाणनगर संघर्ष चौक सोमेश्वर मंदीराजवळ चंदननगर पुणे गणेश थोरात यांची बिल्डींग मुळ रा.मु.पो.पिंपळकोथा ता.एरंडोल जि.जळगाव हा मिळुन येत नव्हता. त्याचेबाबत फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक, श्री.यशपाल सुर्यवंशी यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाल्यावर त्यास मा.जगन्नाथ कळसकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन यांचे आदेशावरुन दुधभट्टी गणेश पेठ पुणे येथे सापळा रचुन शिताफीन पकडुन त्यास वर नमुद फसवणुकीचे गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.श्रीकांत तरवडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्री,प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.जगन्नाथ कळसकर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन पुणे, तसेच उपनिरीक्षक यशपाल सुर्यवंशी,पोहवा बापु खुटवड, पोलीस नाईक दिनेश भांदुर्गे,अमोल सरडे,अमर शिंदे, विशाल चौगुले,मोहन दळवी, यांनी केली आहे.